महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५५५६२३४/२५५५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

कालमर्यादा/तात्काळ

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२२/ 837
दिनांक : 22 FEB 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विदयार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विदयार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.**

**संदर्भ :** १. संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२२/६२ दि.२१/०२/२०२२
२. मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/२२२२/प्र.क्र.०१/प्रनिप्रा/४८० दि. १८.०२.२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय /अशासकीय अनुदानीत, विदयापीठ विभाग, विदयापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विदयार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी करण्यात आली आहे.

प्रवेशित विदयार्थ्यांच्या गुणवत्ता यादी पडताळणी ऑनलाईन पध्दतीने https://cetcell.mahacet.org या लिंकवरुन करण्याबाबतच्या सुचना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून संदर्भाधीन दि. १८.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

सबब सर्व संस्थानी वरील त्याच्या लॉगीनमधुन विदयार्थ्यांची प्रवेश यादी दि.२५.०२.२०२२ पर्यंत Confirm करुन Lock करावी जेणेकरुन या विभागीय कार्यालयास त्या यादीस प्रवेश नियामक प्राधिकरणकडे या शिफारस करता येईल.

सोबत :- वरीलप्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. मा.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य मुंबई याना माहितीस्तव
२.. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/ ६२ | दिनांक : 21 FEB 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया ....

**संदर्भ :** १) मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण /२२२२/प्र.क्र.०१/प्रनिप्रा/०४, दिनांक ४.१.२०२२
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२२/१२,दिनांक ११.१.२०२२
३) मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे दिनांक ३.२.२०२२ आणि दिनांक ४.२.२०२२ रोजीचे ई मेल संदेश
४) मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण /२२२२/प्र.क्र.०१/ प्रनिप्रा/ ४८०, दिनांक १८.२.२०२२

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व आपल्या विभागातील सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था ,खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी करण्याकरिता संचालनालयाच्या वतीने संदर्भाधीन क्रमांक २ च्या पत्रान्वये आपणास प्राधिकृत करण्यात आले आहे.

दरम्यान प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादी पडताळणी ऑनलाईन पध्दतीने http://www.maha-ara.org/ara/index.php या लिंकवरुन करण्याबाबतच्या सुचना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून संदर्भाधीन दिनांक ४.२.२०२२ रोजीचा ई मेल संदेश व दिनांक १८.२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत. ऑनलाईन प्रणालीच्या वापराकरिता प्राधिकरणाकडून संस्था,विभागीय कार्यालय स्तरावर करावयाच्या कार्यवाहीच्या कामाच्या पध्दतीचे टप्पे (Coursewise Work Flow & User Manual) सोबत जोडले आहेत.

| अभ्यासक्रमाचा स्तर | अभ्यासक्रमाचे नाव | प्रपत्र |
|---|---|---|
| पदवी | अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र | प्रपत्र क मध्ये दिलेल्या Work Flow & User Manual प्रमाणे |
| पदव्युत्तर पदवी | अभियांत्रिकी | |
| पदवी | वास्तुशास्त्र, एचएमसीटी | प्रपत्र ड मध्ये दिलेल्या Work Flow & User Manual प्रमाणे |
| पदव्युत्तर पदवी | एमबीए,एमसीए, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एमएचएमसीटी, फार्म डी (पी.बी.) | |
| थेट द्वितीय वर्ष | अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र | |

तसेच दिनांक १८.२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अहवाल ऑफलाईन/ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या स्तरावर विद्यार्थ्यांच्या यादी पडताळणी करुन खालीलप्रमाणे अहवाल संचालनालयास दिनांक १.३.२०२२ पर्यंत सादर करावा.

१. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकडून भरणा केलेल्या प्रक्रिया शुल्काची माहिती (अभ्यासक्रमनिहाय व महाविद्यालयनिहाय ऑनलाईन)
२. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या प्रवेशांची सांख्यिकीय माहिती, (अभ्यासक्रम व महाविद्यालयनिहाय ऑनलाईन व ऑफलाईन) (सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये)
३. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेश पडताळणी अहवाल (विद्यार्थीनिहाय ऑनलाईन) (सोबत जोडलेल्या प्रपत्र ब मध्ये)

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आपल्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश यादीची पडताळणी करून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या अंतिम मान्यतेकरिता उपरोक्त कार्यपध्दतीनुसार **या संचालनालयास दिनांक १ मार्च २०२२ पर्यंत ऑनलाईन सादर करावयात.** प्राधिकरणाच्या संदर्भाधीन दिनांक १८.२.२०२२ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त प्रपत्र आणि Coursewise Work Flow & User Manual जोडून पाठविण्यात येत आहेत.

**(डॉ. अभय वाघ)**
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: १) मा. सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई व मा.आयुक्त ,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव

२) कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव- त्यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणा-या प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती आवश्यक ती प्रक्रिया करुन प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांना सादर करण्यासाठी तयार ठेवण्यात यावी.